**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय जिल्हा परिषद इमारत, नाशिक - 422101**
**दुरध्वनी क्र.** 0253-2461909 **Email-** kumbhmela.2027@mah.gov.in

जा.क्र.नात्रिकुंप्रा/प्र.मा. /१८७/२०२६/ दिनांक -स्वाक्षरी खाली नमूद आहे.

**प्रशासकीय मान्यता आदेश- शुध्दीपत्रक :-**

**विषय:- नवश्या गणपती जवळ नवीन घाट बांधणे या कामाचे नाव व स्थळ बदल करुन आनंदवल्ली येथे नवीन घाट बांधणे - प्रशासकीय मान्यता आदेश शुध्दीपत्रक.**

**संदर्भ:-** १) नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दिनांक २८/०७/२०२५ ठराव क्रमांक ०४.
२) या कार्यालयाचे पत्र दिनांक २९/०७/२०२५.
३) शासनाचे पत्र क्रमांक कुंभमे-२०२५/प्र.क्र.२३५/नवि-२५ दिनांक २९/०८/२०२५.
४) नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ ची मंत्री समितीची २८ ऑक्टोबर २०२५ रोजीचे बैठकीचे इतिवृत्त
५) नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दिनांक ०८/०५/२०२६ विषय क्र. १२ आयत्या वेळचे विषय
६) या कार्यालयाचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र. २३८ दि. १०.१२.२०२५.
७) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक यांचे पत्र क्र. एमएसआयडीसी/एनएसके/५४७/२०२६ दि. २७.०४.२०२६

**वाचा** - नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम, २०२५ चे कलम ७ (१) (ग).

कार्यान्वयीन यंत्रणा- मा. आयुक्त नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे मागणीनुसार या कार्यालयाचे प्रशासकीय मान्यता आदेश दि. १४.०९.२०२५ अन्वये **नवश्या गणपती जवळ नवीन घाट बांधणे** या कामाला **रक्कम रु. ४८.४२ कोटीची** प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. परंतु संदर्भ क्र. ७ अन्वये मागणी केल्याप्रमाणे व नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दिनांक ०८/०५/२०२६ मधील विषय क्र १२ अन्वये प्राप्त सुचनांनुसार नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७-२८ च्या आयोजनासाठीच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या खालील कामांना नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम २०२५ चे कलम ७ (१) (ग) नुसार नमूद केलेल्या अटी शर्तीच्या अधीन राहून संदर्भ क्र. ६ मधील प्रशासकीय मान्यता आदेशातील नाव व स्थळ यामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण (NTKMA)-AA ORDER

| अ.क्र. | कामाचे जुने नाव | कामाचे बदल करण्यात आलेले नाव व स्थळ | कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम (रुपये कोटी) | कार्यान्वयीन यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १ | **नवश्या गणपती जवळ नवीन घाट बांधणे** | **आनंदवल्ली येथे नवीन घाट बांधणे व जुन्या घाटांची दुरुस्ती व संवर्धन** | **४८.४२** | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक |
| | **एकूण** | | **४८.४२** | |

जा.क्र.नात्रिकुंप्रा/प्र.मा. /१८७/२०२६/ दिनांक -स्वाक्षरी खाली नमूद आहे.

**प्रशासकीय मान्यता आदेश- शुध्दीपत्रक (कामाचे नाव व स्थळ बदल)**
**अटी व शर्ती :-**

१. कामाचे ठिकाण व नावात झालेल्या बदलाच्या अनुषंगाने कार्यान्वयीन यंत्रणेने शासनाच्या मार्गदर्शक सुचना/ निर्णय/ ठराव/ परिपत्रक अथवा प्रचलित पध्दतीचा अवलंब करुन सदर कामाबाबत पुढील प्रक्रीया राबविणे आवश्यक आहे. याबाबत कोणताही वाद/ चौकशी/ न्यायालयीन प्रकरण/लेखा आक्षेप झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

२. यापुर्वी देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता आदेशातील सर्व अटी व शर्ती या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या कामाला लागु राहतील याची नोंद घ्यावी.

३. महाराष्ट्र राज्य विधानपरिषद द्विवार्षिक निवडणूक-२०२६; आदर्श आचारसंहिता कालावधीत 'सिंहस्थ कुंभमेळा २०२७' च्या अनुषंगाने आवश्यक कामांना आचारसंहितेतुन वगळण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने नगर विकास विभागाचे पत्र क्र. कुंभ-२०२६/प्र.क्र.६१/नवि-२५ (कुंभ) दि. २५.०५.२०२६ च्या पत्रान्वये भारत निवडणुक आयोगाकडील पत्र क्र. ४३७ /ECI/LAT/FUNC/MT-LC-LAC/BIEN/२०२६ दि. २२.०५.२०२६ पाठविण्यात आले आहे. सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे- " The Commission has no objection from MCC angle to the proposal contained therein subject to the condition that nothing shall be done that can be construed as an inducement to the voters of the poll-bound Constituencies and all relevant provisions of MCC shall be strictly adhered to." तरी सदरचे कामामुळे कोणत्याही प्रकारे मतदारांवर प्रत्यक्ष प्रभाव पडणार नाही याची खबरदारी कार्यान्वयीन यंत्रणेने घेऊन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

Digitally signed by Shekhar Singh
Date: 31-05-2026 11:16:27

**(शेखर सिंह)**
**कुंभमेळा आयुक्त,**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण,**
**नाशिक**

प्रत- अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण (NTKMA)-AA ORDER